## लसीकरण सत्राचा दिवस

- लसीकरण स्थळ आकर्षक बनवणे, लाभार्थ्यांची बसण्याची व्यवस्था इत्यादी कामांमध्ये आशा कार्यकर्ती आणि आरोग्य सेविकेची मदत करा.
- गर्भवती महिलांना आणि पाच वर्षाखालील मुलांच्या पालकांना त्यांच्या बाळाचे लसीकरण करून घेण्याची आठवण करून द्या
- आवश्यकतेनुसार आई-वडिलांना लसीकरणाच्या ठिकाणी घेऊन या किंवा त्यांना घरातील कामात मदत करा

## लसीकरण सत्रानंतर

- लसीकरणानंतर बाळाच्या आरोग्याबद्दल विचारपूस करा
- पालकांना त्यांच्या बालकाचे लसीकरणाचे वेळापत्रक पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहित करा
- लसीकरणानंतर मुलाला ताप किंवा सूज आल्यास, कुटुंबाला सांगा की, काळजी करु नका आणि घाबरु नका, आणि आरोग्य कर्मचाऱ्याला कळवा आणि तापासाठी, आरोग्य सेविकाद्वारे दिलेले पॅरासिटामॉल सिरप द्या.

**सोशल मीडियावर उपलब्ध असलेली लसीकरणासंदर्भातील सर्व माहिती सत्य असेलच असे नाही, म्हणूनच भारत सरकार आणि राज्य सरकार यासारख्या विश्वसनीय स्त्रोतांकडून प्राप्त झालेल्या पोस्टवरच विश्वास ठेवा आणि फॉरवर्ड करा.**

आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार



# पाच वर्षापर्यंतच्या मुलांचे लसीकरण करणे हे समाजाचे महत्त्वाचे काम

मिशन इंद्रधनुष्य ५.0

सुजाण व कर्तव्यदक्ष व्हा!

आपल्या बालकाचे संपूर्ण लसीकरण करून घ्या!

**सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन**

**मिशन इंद्रधनुष्य ५.०** हा नियमित लसीकरणापासून वंचित राहिलेल्या मुलांना राहिलेल्या सर्व लसी देणे आणि आणि गोवर-रुबेला सारख्या आजारांपासून देश मुक्त करण्याचा एक मोठा प्रयत्न आहे. या मोहिमेत काही लसी राहिलेल्या गरोदर महिला आणि पाच वर्षापर्यंतच्या बालकांचे लसीकरण पूर्ण करण्यासाठी आपल्या परिसरात विशेष लसीकरण सत्र आयोजित केले जाईल. तुमच्या मुलाचे डिजिटल एमसीपी कार्ड तयार केले जाईल.

**७-१२ ऑगस्ट**

**११-१६ सप्टेंबर**

**९-१४ ऑक्टोबर**

**२०२३**





## लसीकरण सत्रापूर्वी

- गरोदर स्त्रिया आणि पाच वर्षापर्यंतची मुले असलेल्या सर्व घरांची यादी तयार करा आणि ती यादी 'आशा' कार्यकर्ती सोबत शेअर करा
- ज्या पालकांनी आपल्या मुलांचे यशस्वीरित्या लसीकरण केले आहे त्यांना त्यांचे चांगले अनुभव बैठकांमध्ये सांगायला लावा
- लसीकरणाचे महत्त्व या विषयावर सामुदायिक बैठका आयोजित करा, आशा कार्यकर्ती आणि आरोग्य सेविकेला त्याबद्दल माहिती देण्यासाठी आमंत्रित करा
- समजामध्ये लसीकरणाचे महत्त्व याविषयी रॅली, ओटी भरणे, जेवणाचे कार्यक्रम, भित्तीलेखन यांसारखे जागृती कार्यक्रमांचे आयोजन करा